MHRG070005412026

## फौजदारी चौकशी अर्ज क्र.६७/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश

सदर अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ५०३ अन्वये अर्जदार श्री.सुनिल दयाराम गजघाटे, राहणार – घर नं.२८५४/२बी/एम, खामला रोड, बुध्द विहार जवळ, जुनी वस्ती, नागपूर यांनी कर्जत पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्र.१२०/२०२६ मधील जप्त मुद्देमाल तपशील पुढीलप्रमाणे :– १) रक्कम रुपये १०,०००/– तपशील– भारतीय चलनातील रोख रक्कम, त्यामध्ये १००/– रुपये किंमतीच्या ९८ व २००/– रुपये किंमतीची ०१ भारतीय चलनातील नोट २) रक्कम रुपये ३१,०००/– किंमतीचे १.५ टन इतक्या क्षमतेचे स्प्लीट एअर कंडिशरनचे इनर व आऊटर मशीन, व्हॉल्टास कंपनचे खाकी रंगाच्या कागदी बॉक्समध्ये वेगवेगळे पॅक असलेले, ३) रक्कम रुपये १०,५००/– किंमतीचे, एक तीन बर्नर असलेली लिव्हप्युअर या कंपनीची नवीन गॅस शेगडी, खाकी रंगाच्या कागदी बॉक्समध्ये पॅक असलेली, ४) रक्कम रुपये २,०००/– किंमतीचे एक लाकडी, दोन दरवाजे असलेले, तीन कप्प्याचे शू रॅक, ५) रक्कम रुपये १,५१,५००/– ५००/– रु दराच्या एकूण ३०३ भारतीय चलनातील नोटा, यातील साक्षीदार श्री. निखील दामू शिंदे यांनी हजर केली ती रक्कम ६) रक्कम रुपये ५०,०००/– ५००/– रुपये दराच्या एकूण १०० भारतीय चलनातील नोटा, साक्षीदार राजेश महेंद्र भानूशाली यांनी हजर केली ती रक्कम ७) रक्कम रुपये १२,०००/– रक्कमेचा MCCOY AIR COOLER ८) रक्कम रुपये १२,०००/– रक्कमेचा V–GUARD AIR COOLER ९) रक्कम रुपये २१,०००/– १३६ ६x५ बॉक्स बेंड, हा

मुद्देमाल परत मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, आरोपी यांनी अर्जदार यांचे पैशातून खरेदी केलेल्या वस्तू ह्या अधिक काळ पोलीस स्थानकात राहिल्यास त्यांचे मूल्य कमी होईल व इलेक्ट्रॉनिक वस्तू ह्या योग्य स्थितीत न ठेवल्यास त्या खराब होण्याची शक्यता आहे. सदर वस्तू ह्या योग्य व सुरक्षीत ठेवण्याकामी कोणतेही व्यवस्था ही कर्जत पोलीस स्थानकात नाही. आरोपी यांनी जबरदस्तीने सदरचे पैसे हे अर्जदार यांचेकडून काढून घेतले असून व अर्जदारांचे नावे कर्ज घेतले असून सदर जप्त असलेली रोख रक्कम अर्जदारा यांना मिळावी. वरील सर्व मुद्देमाल अर्जदार यांना देण्यात यावेत. मे. न्यायालयाच्या अटी व शर्ती घालून देईल त्यांचे तंतोतंत पालन करण्यात अर्जदार तयार आहेत.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता आणि तपासी अंमलदार यांचे म्हणणे मागविले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले की, सदर प्रकरणामध्ये जप्त करण्यात मुद्देमाल हा गुन्ह्यांचे तपासातील महत्त्वाचा पुरावा असून तो आरोपीकडून जप्त करण्यात आलेला आहे. सदर मुद्देमाल हा गुन्हे शाबीत करणेसाठी आवश्यक आहे. सदरचा मुद्देमाल, रक्कम हा अर्जदार यांना परत केल्यास त्यामध्ये फेरबदल अथवा रक्कम खर्च करण्याची शक्यता आहे. सबब, गुन्हे शाबातीवर परिणाम होईल. सबब अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा ही विनंती. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झालेला असून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमाल बाबत तपास पूर्ण झालेला आहे.

१) तपशील– भारतीय चलनातील रोख रक्कम, त्यामध्ये १००/– रुपये किंमतीच्या ९८ व २००/– रुपये किंमतीची ०१ भारतीय चलनातील नोट

रक्कम रुपये १०,०००/– २) १.५ टन इतक्या क्षमतेचे स्प्लीट एअर कंडिशरनचे इनर व आऊटर मशीन, व्हॉल्टास कंपनीचे खाकी रंगाच्या कागदी बॉक्समध्ये वेगवेगळे पॅक असलेले रक्कम रुपये ३१,०००/–
३) एक तीन बर्नर असलेली लिव्हप्युअर या कंपनीची नवीन गॅस शेगडी, खाकी रंगाच्या कागदी बॉक्समध्ये पॅक असलेली, रक्कम रुपये १०,५००/–
४) एक लाकडी, दोन दरवाजे असलेले, तीन कप्प्याचे शूरॅक रक्कम रुपये २,०००/–, ५) ५००/– रु दाराच्या एकूण ३०३ भारतीय चलनातील नोटा, यातील साक्षीदार श्री. निखील दामू शिंदे यांनी हजर केली ती रक्कम रुपये १,५१,५००/– ६) ५००/– रुपये दराच्या एकूण १०० भारतीय चलनातील नोटा, साक्षीदार राजेश महेंद्र भानूशाली यांनी हजर केली ती रक्कम रुपये ५०,०००/– ७) एक MCCOY AIR COOLER रक्कम रुपये १२,०००/– , ८) एक V–GUARD AIR COOLER रक्कम रुपये १२,०००/– ९) एक १३६ ६ x ५ बॉक्स बेंड रक्कम रुपये २१,०००/–
सदरचा मुद्देमाल हा योग्य त्या अटी शर्तीवर अर्जदार फिर्यादी यांना परत देण्यास पोलीसाची हरकत नाही.

०४. मी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डची व्हेरीफाईट प्रत, कर्जत सी.आर. क्रं.१२०/२०२६ ची एफ. आय.आरची झेरॉक्स प्रत, दिनांक १८/०४/२०२६ रोजीचे रिमांड रिपोर्टची झेरॉक्स प्रत इत्यादी सदरची कागदपत्रे पडताळुन पाहिली असता सदरील जप्त हा मुद्देमाल अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदरील मुद्देमाल कर्जत पोलीस स्टेशन, यांचे कार्यालयात ठेवुन दिल्यास कोणताही उद्देश साध्य होणार नाही. सबब, सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास परत देणे मला उचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## :: आदेश ::

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | कर्जत पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र.१२०/२०२६ मधील जप्त मुद्देमाल म्हणजेच १) भारतीय चलनातील रोख रक्कम, त्यामध्ये १००/– रुपये किंमतीच्या ९८ व २००/– रुपये किंमतीची ०१ भारतीय चलनातील नोट – रक्कम रुपये १०,०००/–<br>२) १.५ टन इतक्या क्षमतेचे स्प्लीट एअर कंडिशरनचे इनर व आऊटर मशीन, व्हॉल्टास कंपनचे खाकी रंगाच्या कागदी बॉक्समध्ये वेगवेगळे पॅक असलेले रक्कम रुपये ३१,०००/–<br>३) एक तीन बर्नर असलेली लिव्हप्युअर या कंपनीची नवीन गॅस शेगडी, खाकी रंगाच्या कागदी बॉक्समध्ये पॅक असलेली, रक्कम रुपये १०,५००/–,<br>४) एक लाकडी, दोन दरवाजे असलेले, तीन कप्प्यांचे शू रॅक रक्कम रुपये २,०००/–,<br>५) ५००/– रु दाराच्या एकूण ३०३ भारतीय चलनातील नोटा, यातील साक्षीदार श्री. निखील दामू शिंदे यांनी हजर केली ती रक्कम रुपये १,५१,५००/–<br>६) ५००/– रुपये दराच्या एकूण १०० भारतीय चलनातील नोटा, साक्षीदार राजेश महेंद्र भानूशाली यांनी हजर केली ती रक्कम रुपये ५०,०००/–<br>७) एक MCCOY AIR COOLER रक्कम रुपये १२,०००/– ,<br>८) एक V–GUARD AIR COOLER रक्कम रुपये १२,०००/–<br>९) एक १३६ ६ x ५ बॉक्स बेड रक्कम रुपये २१,०००/– सदरचा मुद्देमाल हे अर्जदार श्री.सुनिल दयाराम गजघाटे, यांना रक्कम रुपये |

| | |
|---|---|
| | ३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख मात्र) रुपयांच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अंतरिम स्वरुपात द्यावा. |
| ३. | जप्त मुद्देमाल हा अर्जदाराचे नसल्याचे निष्पन्न झाल्यास सदर मुद्देमालाची किंमत अगर मुद्देमाल अर्जदार यांनी परत करावा. |
| ४. | अर्जदाराने सदर मुद्देमाल हा निर्देशित तारखेस न्यायालयात हजर ठेवावा. तसेच सदर मुद्देमाल हा गहाण, दान, विक्री, त्याचे स्वरुपात कोणताही बदल न करणे, कोणासही हस्तांतरण न करणे व नष्ट न करणे. |
| ५. | तपासी अंमलदार यांनी अर्जदारास सदरचा मुद्देमाल देण्यापुर्वी त्याचे छायाचित्र अर्जदाराच्या खर्चाने काढुन त्याचा सविस्तर पंचनामा तयार करावा व गुन्हयाच्या दोषारोपपत्रात त्याचा समावेश करावा. |
| ६. | अर्जदाराने सदर मुद्देमालाचा वापर कोणत्याही अवैध कारणासाठी करु नये तसेच सदर मुद्देमाल अवैध कोणासही वापरण्यास देऊ नये. |
| ७. | सदर आदेशाची प्रत कर्जत पोलीस स्टेशन यांच्याकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. |

ASAVARI SURESH WADKAR
Digitally signed by ASAVARI SURESH WADKAR
Date: 2026.07.03 18:21:59 +0530

कर्जत. (श्रीमती ए. ए स. वाडकर)

दिनांक : ०३/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.

जि. रायगड